# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. ०९/१२/२०१४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक ०९/१२/२०१४ रोजी सभा सुचना क्र. १४ दि. ०२/१२/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी श्री. दिलीप शिंदे, मा. अप्पर आयुक्त, कोकण भवन हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. परशुराम प. म्हात्रे | सदस्य |
| २. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३. | श्री. अश्विन श्यामजी कासोदरीया | सदस्य |
| ४. | सौ. मंदाकिनी गावंड | सदस्या |
| ५. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| ६. | श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे | सदस्य |
| ७. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ८. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ९. | श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा | सदस्य |
| १०. | श्री. नरेश तुकाराम पाटील | सदस्य |
| ११. | श्री. प्रशांत एन. केळूसकर | सदस्य |
| १२. | श्रीम. नयना म. वसाणी | सदस्या |
| १३. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| १४. | श्री. सुहास माधवराव रकवी | सदस्य |
| १५. | श्री. जयंतीलाल पाटील | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**नगरसचिव :-**

उपस्थित सर्वांचे स्वागत करुन मी सभापती निवडणूकीच्या कामाला सुरुवात करत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा मंगळवार दि. ०९/१२/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १४, दि. ०२/१२/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ९८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २०१४-१५ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत. दि. ०४/१२/२०१४ रोजी नामनिर्देशन स्विकारण्याची वेळ दुपारी ३ ते ५ होती. त्यावेळेमध्ये ४ सदस्यांनी नामनिर्देशन पत्रे दिलेली आहेत. ती मी अनुक्रमे वाचून दाखवतो. १) श्री. केळुसकर प्रशांत नारायण २) श्री. हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर ३) श्री. पाटील नरेश तुकाराम आणि ४) श्री. पांडे हंसुकुमार कमलकुमार हे उमेदवार आहेत. दाखल केलेले चार नामनिर्देशन पत्र मी मा. पिठासीन अधिकाऱ्यांना छाननीसाठी सुपूर्त करीत आहे.

**पिठासीन अधिकारी :-**

स्थायी समिती पदासाठी जी नामनिर्देशन पत्र माझ्याकडे आली आहेत त्याच्यात श्री. केळुसकर प्रशांत नारायण, श्री. हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर, श्री. पाटील नरेश तुकाराम आणि श्री. पांडे हंसुकुमार कमलकुमार ही चार नामनिर्देशन पत्र प्राप्त झाली आहेत. चारही नामनिर्देशन पत्र वैध आहेत. उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यायची असेल त्यांना १५ मिनिटांचा कालावधी देण्यात येतो. ११ वाजून ०४ मिनिट झाली आहेत. ११ वाजून १९ मिनिटापर्यंत मागे घ्यायची आहेत. उमेदवारी मागे घ्यायची वेळ संपली आहे. श्री. हरिश्चंद्र आमगावकर आणि श्री. हंसुकुमार पांडे ह्या दोन उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. त्यामुळे स्थायी समिती सभापती पदासाठी निवडणूक लढविणारे दोन उमेदवार रिंगणात उरले आहेत. श्री. केळुसकर प्रशांत नारायण आणि श्री. पाटील नरेश तुकाराम.

**नगरसचिव :-**

पिठासीन अधिका-यांच्या परवानगीने अनुक्रमे श्री. केळुसकर ह्यांचे नाव प्रथम आहे. श्री. केळुसकर प्रशांत नारायण ह्यांच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. श्री. पाटील नरेश तुकाराम ह्यांच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**पिठासीन अधिकारी :-**

प्रत्यक्ष निवडणुक प्रक्रिया सुरु होणेपुर्वी नियमानुसार उमेदवारांस आपले नामनिर्देशन पत्र मागे घेणे करिता १५ मिनिटांचा अवधी दिला असता दोन उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने एकुण दोन उमेदवार शिल्लक राहिले. ''सभापती'' पद हे एकच असल्याने व उमेदवार दोन असल्याने हात वर करुन मतदान घेतले असता (१) श्री. केळूसकर प्रशांत नारायण ह्यांना ०८ इतकी मते व (२) श्री. पाटील नरेश तुकाराम ह्यांना ०७ इतकी मते मिळाली. श्री. केळूसकर प्रशांत नारायण ह्यांना जास्त मते मिळाल्याने श्री. केळूसकर प्रशांत नारायण यांची निवडून आल्याच्या दिनांकापासुन एक वर्षाकरिता सभापती, स्थायी समिती या पदाकरिता मतदानाद्वारे निवड झाल्याचे मी घोषित करीत आहे.

**प्रकरण क्र. ९८ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २०१४-१५ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणा-या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.

**ठराव क्र. ९४ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमय १९४९ मधील प्रकरण २, कलम २१, पोटकलम (१) श्री. केळूसकर प्रशांत नारायण, (२) श्री. हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर, ३) श्री. पाटील नरेश तुकाराम व ४) श्री. पांडे हंसुकुमार कमलकुमार ह्यांनी आपली नामनिर्देशन पत्र दाखल केली. नामनिर्देशन पत्रांची छाननी केली असता सर्व नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत. प्रत्यक्ष निवडणुक प्रक्रिया सुरु होणेपुर्वी नियमानुसार उमेदवारांस आपले नामनिर्देशन पत्र मागे घेणे करिता १५ मिनिटांचा अवधी दिला असता (१) श्री. हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर, (२) श्री. पांडे हंसुकुमार कमलकुमार ह्यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने एकुण दोन उमेदवार शिल्लक राहिले. ''सभापती'' पद हे एकच असल्याने व उमेदवार दोन असल्याने हात वर करुन मतदान घेतले असता (१) श्री. केळूसकर प्रशांत नारायण ह्यांना ०८ इतकी मते (२) श्री. पाटील नरेश तुकाराम ह्यांना ०७ इतकी मते मिळाली.

**श्री. केळुसकर प्रशांत नारायण ह्यांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नावे :-**

१) डॉ. राजेंद्र भंवरलाल जैन
२) श्री. कासोदरीया अश्विन श्यामजी
३) सौ. मंदाकिनी गावंड
४) श्री. हरिश्चंद्र आमगावकर
५) श्री. प्रशांत एन. केळुसकर
६) श्रीम. नयना मनोज वसाणी
७) श्री. मोहन महादेव जाधव
८) श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील

**श्री. पाटील नरेश तुकाराम ह्यांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नावे :-**

१) श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे
२) श्री. पांडे हंसूकुमार कमलकुमार
३) सौ. प्रभात प्रकाश पाटील
४) श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा
५) श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंग
६) श्री. नरेश तुकाराम पाटील
७) श्री. सुहास माधवराव रकवी

| | | |
|---|---|---|
| **तटस्थ सदस्यांची नांवे –** | **निरंक** | |
| **मतदानावेळी एकूण हजर सदस्य** | **:-** | **१५** |
| **श्री. प्रशांत नारायण केळूसकर ह्यांच्या बाजूने** | **:-** | **०८** |
| **श्री. नरेश तुकाराम पाटील ह्यांच्या बाजूने** | **:-** | **०७** |
| **तटस्थ** | **:-** | **००** |
| **अनुपस्थित सदस्य** | **:-** | **००** |
| **एकूण** | **:-** | **१५** |

श्री. केळूसकर प्रशांत नारायण ह्यांना जास्त मते मिळाल्याने श्री. केळूसकर प्रशांत नारायण यांची निवडून आल्याच्या दिनांकापासुन एक वर्षाकरिता सभापती, स्थायी समिती या पदाकरिता मतदानाद्वारे निवड झाल्याचे मी घोषित करीत आहे.

**सही /-**
**पिठासीन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

नवनिर्वाचित सभापतींचे मा. पिठासीन अधिकारी पुष्पगुच्छ देवून स्वागत करीत आहेत.

**पिठासीन अधिकारी :-**

ही निवडणूक प्रक्रिया संपल्याचे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ दु. ११.२५ वा.)**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**



नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका